# पिरिकन पिक आणि पिरिकन मोर




लेखक- ह्युग ल्युप्टन

चित्र- युमी हिओ

मराठी अनुवाद- सानिया

# पिरिकन पिक आणि पिरिकन मोर






# पिरिकन पिक आणि पिरिकन मोर



खूप खूप वर्षांपूर्वी एका गावात दोन मित्र राहायचे.
एकाचं नाव होतं पिरिकन पिक तर दुसऱ्याचं पिरिकन मोर.
एके दिवशी दोघे सवंगडी अक्रोड गोळा करायला अक्रोडाच्या झाडापाशी गेले.
पिरिकन मोर झाडावर चढला. फांद्यांना लगडलेले अक्रोड तोडून तो पिरिकन पिककडे फेकू लागला.
पिरिकन पिक अक्रोडांचा ढिग गोळा करून झाडाखाली बसला. छोट्याश्या हातोडीने तो एक एक अक्रोड फोडू लागला.



पण गंमत म्हणजे पिरिकन पिक अक्रोड फोडत होता आणि लगेच ते तोंडात टाकून फस्त करत होता. त्यामुळे पिरिकन मोर झाडावरून खाली उतरेपर्यंत त्याच्यासाठी एकही अक्रोड शिल्लक राहिला नाही.

“अरे! त्यातले अर्धे अक्रोड तर माझे होते.” तो म्हणाला. “थांब आता मी एक काठी शोधतो आणि तुला चांगलं बदडून काढतो!”

एवढं बोलून पिरिकन मोर काठी शोधायला लागला. त्याला झाडाची एक लांब फांदी दिसली. तो झाडाला म्हणाला,

“मला हवी आहे काठी दणकट आणि मजबूत
त्याने पिरिकन पिकला काढीन मी बदडून
लबाडाने माझे सारे अक्रोड टाकलेत खाऊन!”

“हो चालेल ना.” झाड म्हणालं. “पण फांदी तोडण्यासाठी तुला आधी कुऱ्हाड शोधावी लागेल.





मग पिरिकन मोर कुऱ्हाड शोधायला निघाला. लवकरच त्याला जंगलात लाकडाच्या ओंडक्यांपाशी पडलेली एक कुऱ्हाड दिसली. तो कुऱ्हाडीला म्हणाला,

"धारदार कुऱ्हाड हवी आहे मला,
झाडाची मजबूत फांदी कापायला
त्याने पिरिकन पिकला काठीन मी बदडून
लबाडाने माझे सारे अक्रोड टाकलेत खाऊन!"


"नक्की" कुऱ्हाड म्हणाली. "पण तू बघितलंस का? माझी धार गेली आहे. पहिले तुला धार करण्यासाठी दगड शोधावा लागेल."

लगेच पिरिकन मोर धार काढण्याचा दगड शोधायला निघाला. तळ्याकाठच्या दगडगोट्यांमध्ये त्याला हवा तसा दगड सापडला. तो दगडाला म्हणाला,

"धारदार दगड हवा आहे मला,
बोथट कु-हाडीची धार काढायला
झाडाची मजबूत फांदी कापायला
त्याने पिरिकन पिकला काढीन मी बदडून
लबाडाने माझे सारे अक्रोड टाकलेत खाऊन!"

"खुशाल माझा वापर कर" दगड म्हणाला. "पण मला ओलं करण्यासाठी तुला आधी थोडं पाणी घ्यायला लागेल."





पिरिकन मोर निळ्याशार तळ्याकाठी बसला आणि म्हणाला,

“ओंजळभर पाणी हवं आहे मला,
धार काढण्याचा दगड ओला करायला
बोथट कुऱ्हाडीला धार मी करेन
झाडाची मजबूत फांदी कापेन
त्याने पिरिकन पिकला काढीन मी बदडून
लबाडाने माझे सारे अक्रोड टाकलेत खाऊन!”

“चालेल” तळं म्हणालं. “तुला हवं तितकं पाणी तू घेऊ शकतोस. पण माझ्या पाण्यात पोहण्यासाठी तुला मोठी शिंग असणाऱ्या हरणाची मदत घ्यावी लागेल.

पिरिकन मोर मोठी शिंगं असणाऱ्या हरणाच्या शोधात निघाला. घनदाट जंगलात त्याला एक हरीण दिसलं. तो त्याला म्हणाला,

"मोठ्या शिंगांचं हरीण हवं आहे मला,
निळंशार तळं पोहून जायला
धार काढण्याच्या दगडाला ओलं मी करेन
बोथट कुऱ्हाडीला धार मी करेन
झाडाची मजबूत फांदी कापेन
त्याने पिरिकन पिकला काठीन मी बदडून
लबाडाने माझे सारे अक्रोड टाकलेत खाऊन!"

"वेगाने धावणारा शिकारी कुत्रा मागे लागल्याशिवाय मी पाण्यात शिरणार नाही" हरीण म्हणालं.





ताबडतोब पिरिकन मोर कुत्रा शोधायला निघाला. आपल्या घरात आरामात पहुडलेला एक कुत्रा त्याच्या नजरेस पडला. कान टवकारलेला तो कुत्रा एक डोळा उघडा ठेवून चोहीकडे बघत होता. तो त्याला म्हणाला,

“चपळ कुत्रा हवा आहे मला,
शिंगंवाल्या हरणाचा पाठलाग करायला
निळंशार तळं पोहून मी जाईन
धार काढण्याच्या दगडाला ओलं करीन
बोथट कु-हाडीला धार मी करेन
झाडाची मजबूत फांदी कापेन
त्याने पिरिकन पिकला काढीन मी बदडून
लबाडाने माझे सारे अक्रोड टाकलेत खाऊन!”

“हरकत नाही. मजा येईल.” कुत्रा म्हणाला. “पण तू पहिले मऊ लोण्याने माझे पाय चोळून दिले पाहिजेस.”



लगेच पिरिकन मोर लोण्याच्या शोधात निघाला. शेतावरच्या घरातल्या स्वयंपाकघरात तो डोकावला. टेबलावर चिनीमातीच्या ताटलीत थोडं लोणी ठेवलं होतं. तो लोण्याला म्हणाला,

"मऊ मऊ लोणी हवं आहे मला,
कुत्र्याच्या पायांना मालिश करायला
शिंगवाल्या हरणाचा करेल तो पाठलाग
निळंशार तळं पोहून जाईन मी त्याच्या मागोमाग
धार काढण्याच्या दगडाला ओलं मी करेन
बोथट कुऱ्हाडीला धार करेन
झाडाची मजबूत फांदी कापेन
त्याने पिरिकन पिकला काढीन मी बदडून
लबाडाने माझे सारे अक्रोड टाकलेत खाऊन!"

"हो हो चालेल ना." लोणी म्हणालं. "पण आधी मला कुरतडण्यासाठी तू एखाधा उंदराला शोधलं पाहिजेस."





लवकरच त्याला एक उंदीर दिसला. सामान ठेवायच्या कोठीघरात तो पावाचे बारीक तुकडे फस्त करत होता. पिरिकन मोर उंदराला म्हणाला,

“धारदार दातांचा उंदीर हवा आहे मला,
स्वयंपाकघरातील लोणी कुरतडायला
लोण्याने कुत्र्याचे पाय मी चोळेन
मग शिंगवाल्या हरणाचा पाठलाग तो करेल
निळंशार तळं पोहून मी जाईन
धार काढण्याच्या दगडाला ओलं करीन
बोथट कुऱ्हाडीला धार मी करेन
झाडाची मजबूत फांदी कापेन
त्याने पिरिकन पिकला काढीन मी बदडून
लबाडाने माझे सारे अक्रोड टाकलेत खाऊन!”

“जाडजूड काळी मांजर माझ्या मागे लागली तरच मी स्वयंपाकघरातलं लोणी कुरतडेन.” उंदीर म्हणाला.

लगेच निघाला पिरिकन मोर मांजरीला शोधायला. गोठ्याच्या छपरावर अंगाचं मुटकुळं करून बसलेली मांजर त्याच्या नजरेस पडली. तो तिला म्हणाला,

"काळीकुट्ट मांजर हवी आहे मला,
धारदार दातांच्या उंदराचा पाठलाग करायला
मग तो स्वयंपाकघरातील लोणी कुरतडेल
लोण्याने कुत्र्याचे पाय मी चोळेन
शिंगवाल्या हरणाचा करेल तो पाठलाग
निळंशार तळं पोहून जाईन मी त्याच्या मागोमाग
धार काढण्याच्या दगडाला ओलं मी करेन
बोथट कुऱ्हाडीला धार करेन
झाडाची मजबूत फांदी कापेन
त्याने पिरिकन पिकला काढीन मी बदडून
लबाडाने माझे सारे अक्रोड टाकलेत खाऊन!"

"अरे वा! उंदराचा पाठलाग करणं तर माझं सर्वात आवडीचं काम आहे." मांजर जिभल्या चाटत म्हणाली. "पण आधी मला बशीभर दुध आणून देतोस का? मला खूप तहान लागली आहे."





मग पिरिकन मोर गाईच्या शोधात निघाला. लवकरच हिरव्यागार कुरणात रवंथ करत असलेली गाय त्याला दिसली. तो तिला म्हणाला,

"पांढरशुभ्र दुध हवं आहे मला,
काळ्याकुट्ट मनीमाऊची तहान भागवायला
धारदार दातांच्या उंदराचा पाठलाग ती करेल
मग तो स्वयंपाकघरातील लोणी कुरतडेल
लोण्याने कुत्र्याचे पाय मी चोळेन
शिंगवाल्या हरणाचा करेल तो पाठलाग
निळंशार तळं पोहून जाईन मी त्याच्या मागोमाग
धार काढण्याच्या दगडाला ओलं मी करेन
बोथट कु-हाडीला धार करेन
झाडाची मजबूत फांदी कापेन
त्याने पिरिकन पिकला काढीन मी बदडून
लबाडाने माझे सारे अक्रोड टाकलेत खाऊन!"

"तुला पाहिजे तितकं दुध मी देईन." गाय म्हणाली. "पण पहिले तू मला थोडा चारा आणून दे."

गाईच्या सांगण्यावरून पिरिकन मोर चारा आणायला निघाला. धान्याच्या कोठारापाशी झाडू मारणारा पोऱ्या त्याच्या नजरेस पडला. तो त्याला म्हणाला,

"गाईसाठी चारा हवा आहे मला,
तिच्याकडून पांढरंशुभ्र दुध मिळवायला
काळ्याकुट्ट मनीमाऊची भागेल तहान
उंदराचा पाठलाग ती करेल छान
मग तो स्वयंपाकघरातील लोणी कुरतडेल
लोण्याने कुत्र्याचे पाय मी चोळेन
शिंगवाल्या हरणाचा करेल तो पाठलाग
निळंशार तळं पोहून जाईन मी त्याच्या मागोमाग
धार काढण्याच्या दगडाला ओलं मी करेन
बोथट कुऱ्हाडीला धार करेन
झाडाची मजबूत फांदी कापेन
त्याने पिरिकन पिकला काढीन मी बदडून
लबाडाने माझे सारे अक्रोड टाकलेत खाऊन!"

"इथे गाईसाठी भरपूर चारा आहे." पोऱ्या म्हणाला. "पण पहिले मला पाववाल्याकडून एक गरमागरम पाव आणून दे पाहू."





पिरिकन मोर धावत पळत पाववाल्याकडे गेला. पाववाला एका मोठ्या परातीत पीठ ओतत होता. तो त्याला म्हणाला,

"गरमागरम लादीपाव हवा आहे मला,
झाडू मारणाऱ्या पोऱ्याला द्यायला
मग तो गाईला चारा देईल
गाय पांढरंशुभ्र दुध देईल
काळ्याकुट्ट मनीमाऊची भागेल तहान
उंदराचा पाठलाग ती करेल छान
मग तो स्वयंपाकघरातील लोणी कुरतडेल
लोण्याने कुत्र्याचे पाय मी चोळेन
शिंगवाल्या हरणाचा करेल तो पाठलाग
निळंशार तळं पोहून जाईन मी त्याच्या मागोमाग
धार काढण्याच्या दगडाला ओलं मी करेन
बोथट कुऱ्हाडीला धार करेन
झाडाची मजबूत फांदी कापेन
त्याने पिरिकन पिकला काढीन मी बदडून
लबाडाने माझे सारे अक्रोड टाकलेत खाऊन!"

"माझ्याकडे विविध प्रकारचे ताजे लुसलुशीत पाव मिळतील." पाववाला म्हणाला. "पण पीठ भिजवण्यासाठी मला पहिले थोडं पाणी लागेल." पाववाल्याने पिरिकन मोरला चाळणी दिली आणि विहिरीतून पाणी आणण्यासाठी पिटाळलं.





पिरिकन मोर विहिरीपाशी गेला आणि त्याने चाळणी पाण्यात सोडली. त्याने चाळणी बाहेर काढली तर काय आश्चर्य! त्यात पाण्याचा एक थेंबही नव्हता. सगळं पाणी चाळणीच्या भोकांमधून निसटून पुन्हा विहिरीत गेलं होतं. त्याने पुन्हा पुन्हा प्रयत्न केला. पण चाळणीत पाणी क्षणभरही टिकत नव्हतं.

बिचारा पिरिकन मोर!
त्याने रागाने चाळणी फेकून दिली.
हातांनी चेहरा झाकून घेतला आणि तो मोठमोठ्याने रडू लागला.

तेवढ्यात आकाशातून एक पांढराशुभ्र बगळा उडत आला. तो पिरिकन मोरला म्हणाला,
"चाळणीला मऊसूत काळ्या मातीचा लेप दे."





थोडी शोधाशोध केल्यावर पिरिकन मोरला काळी माती मिळाली. त्या मऊ काळ्या चिखलाने त्याने चाळणीची सगळी भोकं बुजवून टाकली. मग त्याने चाळणी उन्हात वाळण्यासाठी ठेवून दिली. चिखल वाळून घट्ट झाल्यावर त्याने चाळणी पुन्हा विहिरीत सोडली. पण सगळा चिखल पाण्यात विरघळला आणि पाणी भोकांमधून पुन्हा विहिरीत निघून गेलं.

बिचारा पिरिकन मोर!

त्याची सगळी मेहनत वाया गेली. वैतागून त्याने चाळणी फेकून दिली आणि पुन्हा बसला रडत. तेवढ्यात एक कावळा उडत उडत आला आणि म्हणाला, "त्यावर तपकिरी चिकणमातीचा थर दे."









लगेच पिरिकन मोरने तपकिरी चिकणमाती शोधली आणि तिचा चाळणीवर सगळी भोकं नीट बुजली जातील असा जाडसर थर दिला. मग त्याने ती कडकडीत उन्हात वाळवली.

चिकणमाती चाळणीवर घट्ट बसली आहे याची खात्री झाल्यावर त्याने ती विहिरीत सोडली. यावेळी मात्र चाळणीने पाणी अगदी व्यवस्थित धरून ठेवलं.

पिरिकन मोरने काळजीपूर्वक एकही थेंब न सांडता पाणी पाववाल्याला नेऊन दिलं. पाववाल्याने पीठ भिजवलं आणि दोन गरमागरम लादीपाव पिरिकन मोरला दिले.



पिरिकन मोरने एक पाव फस्त केला आणि दुसरा पोऱ्याला दिला.

पोऱ्याने गाईसाठी दिला पोतंभर चारा,
गाईने मग दुध दिलं भराभरा.
दुधाने मनीमाऊची भागली तहान,
छोट्याश्या उंदराचा केला पाठलाग छान.
उंदराने टाकलं लोणी कुरतडून,
लोण्याने कुत्र्याचे पाय दिले मळून.
शिंगवाल्या हरणाचा कुत्र्याने केला पाठलाग,
तळं पोहून पिरिकन मोर गेला त्याच्या मागोमाग.
पाण्याने ओला केला दगड
कुऱ्हाडीला धार केली भरभर
कुऱ्हाडीने झाडाची फांदी टाकली कापून
म्हणाला,"पिरिकन पिकला काढतो मी बदडून."





पण तो अक्रोडाच्या झाडापाशी येऊन बघतो तर काय!
तिथे कुणी नव्हतंच मुळी.
त्याने इकडे बघितलं नि तिकडे बघितलं. पिरिकन पिकचा पत्ताच नाही. तेवढ्यात एक मोठा ढिग त्याच्या नजरेस पडला. व्यवस्थित फोडून ठेवलेल्या अक्रोडांचा! त्याने एक अक्रोड उचलला आणि तोंडात टाकला. “अहाहा!” तो म्हणाला. “भन्नाट!”
त्याने हातातली काठी फेकून दिली. मऊमऊ गवतावर बसला आणि . . . . .



सगळ्या अक्रोडांचा फडशा पाडला!

समाप्त